# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission


क्र : मविनिआ/माअअ/23/2018/ 0490

दि. 16.04.2018

प्रति,
श्री. दामोदर जुगलकिशोर पारिक,
नवजीवन कॉलनी, मु.पो.ता. वैजापुर,
जिल्हा- औरंगाबाद- ४२३ ७०१

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. २६.०३.२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No. | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| 1. | ग्राहक गा-हाणी निवारण मंचाच्या (CGRF) सदस्य निवडीच्या समितीची निवड कोण करते व सदर समिती सदस्यांची पात्रता या संदर्भात सविस्तर माहिती मला देण्यात यावी. | कृपया महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २००६ आणि सुधारणा पहावे. सदर विनियम, आयोगाच्या www.merc.gov.in & www.mercindia.org.in या संकेतस्थळावरुन मोफत स्वरुपात उतरवून घेण्यासाठी उपलब्ध आहे. |
| 2. | दि. 23.01.2018 रोजी CGRF सदस्यांच्या निवडीसाठी आलेल्या अर्जदारांच्या मुलाखती घेणा-या निवड समितीच्या सदस्यांची नावे व पदनाम, सदर निवड समितीच्या सदस्यांची पात्रता व त्यांच्या नेमणूक (सदस्य निवड समितीवर सदस्य म्हणून) झालेल्या/ केल्याच्या पत्रांच्या सत्य प्रती मला देण्यात याव्या. | दि. 23.01.2018 रोजी CGRF सदस्यांच्या निवडीसाठी आलेल्या अर्जदारांच्या मुलाखती घेणा-या निवड समितीच्या सदस्यांची नावे व पदनाम, यासंबंधीचा आदेश क्र. 5069 दि. 02.01.2018 ची प्रत सोबत जोडली आहे (एकूण 1 प्रत). |
| 3. | उपरोक्त निवड समिती कोणत्या कायद्यान्वये गठित केली जाते त्या संदर्भातील कायद्यातील तरतूदींची माहिती मला पूरविण्यात यावी. | विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम ४२ च्या उपकलम (५) नुसार आणि आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने सदस्य (ग्राहक संरक्षण संस्थांचा प्रतिनिधी) याच्या नामनिर्देशनासाठी आवश्यक अर्हता, अटी व शर्ती तसेच निवड प्रक्रिया विहित केली आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे (एकूण 3 प्रती). |


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

| | | |
|---|---|---|
| 4. | निवड समितीने CGRF सदस्य निवडीमध्ये निकष पाळले नाही तर या संदर्भात तक्रार कुणाकडे करावी त्याचा संपूर्ण पत्ता मला देण्यात यावा. | लागू नाही. |
| 5. | दि. 23.01.2018 रोजी CGRF सदस्यांच्या नियुक्ती साठी ज्या मुलाखती घेण्यात आल्या त्यातील नियुक्त सदस्यांनी कोण कोणत्या ग्राहक संघटनांचे शिफारस पत्र जोडले आहेत. त्यांच्या सत्यप्रती मला देण्यात याव्यात. | दि. 23.01.2018 रोजी औरंगाबाद आणि पुणे परिमंडळासाठीचे CGRF सदस्यांच्या नियुक्तीसाठी मुलाखती घेण्यात आल्या. त्यांनी सादर केलेले ग्राहक संघटनांचे शिफारस पत्र सोबत जोडलेले आहे. बारामती परिमंडळासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली नाही (एकूण 7 प्रती). |
| 6. | दि.23.01.2018 रोजी CGRF सदस्यांच्य नियुक्तीसाठी घेण्यात आलेल्या मुलाखतीत निवड झालेल्या व CGRF सदस्य पदी नियुक्त केलेल्या सदस्यांना शिफारस म्हणून मंत्र्यांनी, राजकीय पुढाऱ्यांच्या किंवा राजकीय पक्षांनी शिफारस पत्र दिले असल्यास त्यांच्या देखील सत्यप्रती मला देण्यात याव्यात. | निरंक |

सदर उपलब्ध करुन दिलेली माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी